SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
NAAC `A` Grade
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

## :: परिपत्रक ::

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

विद्यापीठ संलग्नित सर्व

कायम विनाअनुदानित/विना अनुदानित शिक्षणशास्त्र

व शारीरिक शिक्षण महाविद्यालये,

विषय : कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.....

महोदय/महोदया,

मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचेकडील जा.क्र. बीएड्.४६२०/प्र.क्र.९१(२)/मशि-२ दि. २१.१०.२०२० रोजीचे पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबतप्रमाणे अग्रेषित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करून तत्सम कार्यवाहीबाबत विद्यापीठास अवगत करण्यात यावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

संदर्भ क्र. : शिवाजी वि/संलग्नता/टी-२/बीएके/ No 572
दि. 09 DEC 2020

E:\E\Baba\2017-18\Circular Format.Docx

**महाराष्ट्र शासन**

T2

DEC 2020

क्रमांक:बीएड-४६२०/प्र.क्र. ९१(२)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२०.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ :- (१) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.११.०७.२०१६.
(२) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.२७.०७.२०१७.
(३) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२, दि.१२.०७.२०१८.
(४) शासन पत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(१)/मशि-२, दि.१२.०७.२०१९.
(५) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.बी.एड-२५२०/प्र.क्र.५१/सीईटीसेल/४३००, दि. ०४.०६.२०२०.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक ४ येथील पत्रान्वये, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केलेल्या, तसेच काही अटींच्या अधिन राहून शिफारस केलेल्या राज्यातील कायम विनाअनुदानित/ विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे :-

(क) ज्या महाविद्यालयास एन.सी.टी.ई./आर.सी.आय. यांनी शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमांस यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, मा. उच्च / मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार यापूर्वी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले आहे व सद्यस्थितीत सुरु आहेत, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी संलग्निकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-
Inward No 1179
Date 03/12/2020

(ख) एन.सी.टी.ई./आर.सी.आय. च्या नियमाप्रमाणे सदर अभ्यासक्रमांचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.एड/ एम.एड/ बी.ए.बी.एड-बी.एस.सी. बी.एड/ बी.एड-एम.एड/ बी.पी.एड./ एम.पी.एड. या अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.०५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व एन.सी.टी.ई./आर.सी.आय. ने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे एन.सी.टी.ई./आर.सी.आय. ला कळविण्यात यावी. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) एन.सी.टी.ई./आर.सी.आय. च्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव एन.सी.टी.ई./आर.सी.आय. ने महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपला,

द.रा.कहार

( द. रा. कहार )

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

(२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत)

(३) सर्व संबंधित कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत)

(४) निवड नस्ती (मशि-२)